**Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar**

**Date: 20 August 2024**

**Time: 7.10 to 7.20 AM**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

प्रादेशिक बातम्या

दिनांक: **२० ऑगस्ट** २०२४ सकाळी **७.१०** मि.

****

*ठळक बातम्या*

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत एक कोटी चार लाख लाभार्थ्यांच्या खात्यात पहिल्या दोन हप्त्यांचा निधी जमा - मुख्यमंत्र्यांची माहिती
- मराठा आरक्षणासंदर्भात मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या आरोपांचं मुख्यमंत्र्यांकडून खंडन
- राज्य शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेच्या वतीने धाराशिव जिल्ह्यात पाच ठिकाणी जर्मन भाषा प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा निर्णय

  आणि
- राज्यात बहुतांश भागात काल पावसाची हजेरी, हिंगोली आणि बुलडाणा जिल्ह्यात वीज पडून दोन महिलांचा मृत्यू

*सविस्तर बातम्या*

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र झालेल्या एक कोटी चार लाख लाभार्थ्यांच्या खात्यात पहिल्या दोन हप्त्यांचा निधी जमा करण्यात आल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. मुंबईत काल मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. राज्यभरातून सुमारे एक हजार महिला मुख्यमंत्री शिंदे यांना ओवाळण्यासाठी आणि राखी बांधण्यासाठी आल्या होत्या. महिलांच्या खात्यात जमा झालेले पैसे लाभार्थ्यांशिवाय अन्य कुणालाही काढता येणार नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. कागदपत्रे आणि तांत्रिक कारणांमुळे ज्यांना निधी मिळाला नाही, त्या अडचणी

दूर करून त्यांनाही लाभ मिळणार असल्याचं ते म्हणाले. लाडकी बहीण योजनेतल्या निधीची रक्कम वाढवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. उमेद अभियानातल्या महिलांच्या अडचणी सोडवण्यासाठी लवकरच विशेष बैठक घेणार असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

****

राज्यातल्या महिला आज स्वतःच्या पायावर उभं राहण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांच्या पाठीशी सरकारने उभं राहायला हवं, म्हणूनच मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना आणली असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसन्मान यात्रेच्या निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यापुढेही अशा योजना चालवण्यासाठी महायुतीच्या पाठीशी ठाम राहावं, असं आवाहन पवार यांनी यावेळी केलं.

****

बहीण भावांच्या नात्याचे बंध अधिक घट्ट करणारा रक्षाबंधन हा सण काल देशभर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. काल सकाळपासूनच बहिणींनी आपल्या भावांना राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्याची कामना केली. विविध राजकीय पक्ष आणि संघटनांतर्फे रक्षाबंधन सोहळे आयोजित करण्यात आले **होते**. रक्षाबंधनानिमिमत्त विविध सामाजिक सांस्कृतिक आणि धार्मिक संस्थांच्या प्रतिनिधींनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे भेट घेऊन त्यांना राखी बांधली. यावेळी राज्यपालांनी सर्वांना रक्षा बंधनाच्या शुभेच्छा दिल्या. पालघर जिल्ह्यातल्या सेवा विवेक ग्राम विकास केंद्रामधल्या, आदिवासी बांबू महिला कारागिरांनी राज्यपालांना बांबूपासून तयार केलेली पर्यावरण स्नेही राखी बांधली.

धाराशिव शहरातल्या श्री बाल हनुमान गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सीमेवरील सैनिकांसाठी राख्या पाठवण्यात आल्या.

नारळी पौर्णिमा देखील काल साजरी झाली. या निमित्ताने राज्यात किनापट्टीवरच्या कोळी वसाहतींमधे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

****

मराठा समाजासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयाला आपण नेहमी पाठिंबाच दिला, मात्र आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील हे चुकीचं नरेटिव्ह तयार करत असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्री मराठा आरक्षण तसंच सगेसोयरे अशा सर्व प्रश्नांवर काम करू इच्छितात, मात्र फडणवीस त्यांना हे काम करु देत नसल्याचा आरोप जरांगे-पाटील यांनी केला, त्यावर फडणवीस काल वार्ताहरांशी बोलत होते. मराठा आरक्षणासंदर्भात कोणत्याही निर्णयाला आपण पाठिंबा दिला नाही, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं, तर मी राजीनामा देत राजकारणातून निवृत्त होईन, असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री शिंदे यांनी जरांगे यांचे आरोप फेटाळून लावले आहेत. काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना त्यांनी, देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते तेव्हा मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचं स्पष्ट केलं. फडणवीस मराठा समाजाला विरोध करतात, हा आरोप पूर्णपणे चुकीचा असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय साहित्य आणि कलागौरव पुरस्काराचं वितरण काल अहमदनगरमधे करण्यात आलं. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नवनियुक्त अध्यक्ष रवींद्र शोभणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते, तर केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यंदा जेष्ठ साहित्यिक आणि विचारवंत प्रेमानंद गज्वी यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

****

राज्य शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेच्या वतीने धाराशिव इथं पाच ठिकाणी जर्मन भाषा प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहे. जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य दयानंद जटनुरे यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. जर्मनीला पाच लाख मनुष्यबळ पुरवण्यासंदर्भात राज्य सरकारचा करार झाला आहे. त्याचाच भाग म्हणून हा उपक्रम सुरू केला आहे. इच्छुकांनी यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचं आवाहन प्राचार्य जटनुरे यांनी केलं आहे.

****

महसूल पंधरवाड्या अंतर्गत बीड इथं काल 'एक धाव सुरक्षेची' महामॅरेथॉन घेण्यात आली. अंबिका चौक ते संत सेवालाल महाराज चौक मार्गाने जाणार्या मॅरेथॉनला जिल्हा क्रीडा अधिकारी पंडीत चव्हाण यांनी हिरवा झेंडा दाखवला. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून विविध जनजागृतीपर संदेश यावेळी देण्यात आले. महिलांसह माजी सैनिक, विद्यार्थी या स्पर्धेत मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

****

लातूर जिल्ह्यात महात्मा ज्योतिबा फुले संशोधन आणि प्रशिक्षण संस्था - महाज्योती मार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून, याबाबत चित्ररथाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. या चित्ररथाचं काल प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले यांनी हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. हा चित्ररथ जिल्ह्यातील ग्रामीण भागात जाऊन योजनांची माहिती देणार आहे

****

देशात संविधानाला खरा न्याय भारतीय जनता पक्ष आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला, असं मत संविधान जागर यात्रेचे संयोजक डॉ. वाल्मिक गायकवाड यांनी व्यक्त केलं. संविधान जागर यात्रेचं काल धाराशिव जिल्ह्यात तुळजापुरात आगमन झालं, त्यावेळी ते बोलत होते. आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

****

राज्यात काल अनेक ठिकाणी पाऊस झाला. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव इथं काही वेळ जोरदार पाऊस झाला.

जालना शहर परिसरात तसंच जिल्ह्यातल्या मंठा, परतूर तालुक्यात आज दुपारी जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे परतूर तालुक्यातल्या काही भागातल्या नदी-नाल्यांना पूर आला होता. तर या पावसामुळे खरिपातल्या पिकांना जीवनदान मिळाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. धाराशिव शहरातही काल रात्री दोन तास मुसळधार पाऊस झाला.

****

हिंगोली जिल्ह्यात सेनगाव तालुक्यातल्या साखरा शिवारात अंगावर वीज पडून एका शेतकरी महिलेचा मृत्यू झाला. या घटनेत त्यांचे पती गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर हिंगोली इथल्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

नाशिक, अकोला आणि बुलडाणा जिल्ह्यातही काल जोरदार पाऊस झाला. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने मलकापूर तालुक्यातल्या म्हैसवाडी इथं पुष्पा राणे या मजूर महिलेचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला, तर एक महिला गंभीर जखमी झाली.

****

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी, तर कोकण, मराठवाडा आणि विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

****